One Mr. Suhas Purushottam Sathe, Age 63, Occupation: Retired, R/o 2/40 Goregaonkar Building, Raja Ram Mohan Roy Marg, Near Central Plaza, Girgaon, Mumbai 400004 claiming to be son of deceased abovenamed late Purushottam Vishnu Sathe has filed the above-mentioned petition for grant of Administrator General's Certificate under section 29 of the administrators General Act, 1963 as amended by Act 12 of 2002 in respect of estate of the said deceased who died intestate at Goregaonkar Building, Mumbai on 23th day of November 2006 leaving behind following estate:

Name of share	Folio No.	No. of shares held	Rs.
Pfizer Ltd	PFZ0105965	29	1,46,160/-
Basf	BAP0010800-6	16	58,560/-
Modern Insulator Ltd.	P02985	100	29,000/-

Total Value of Petition is Rs.2,33,720/-

Any person, who has any objection for grant of Administrator General's Certificate in favour of the petitioner abovenamed in respect of the above said estate of the said deceased, is hereby notified to come and see the proceedings to the Office of the undersigned at 2nd Floor, Old Secretariate. Near Elphinstone College, Mahatma Gandhi Road, Mumbai 400032 within 30 days from the date hereof and lodge his/ her say, if any.

Mumbai dated this 17th day of November 2026

Sd/-
(Dr. Chandrashekhar S. Bahakar)
Administrator General
Maharashtra State, Mumbai

VIRTUOSO OPTOELECTRONICS LIMITED
CIN No. L74999MH2015PLC268355
Registered Office: P NO. 7 MIDC SATPUR NASIK
Nashik MH 422007 IN | **Tel:** +91-0253 2309016
Email: info@voepl.com | **Website:** www.voepl.com

NOTICE OF POSTAL BALLOT

To ,
All Members,

NOTICE is hereby given, pursuant to the provisions of Section 108, 110 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013 ("the Act") read with Rule 20 and Rule 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 ("the Rules"), read with the General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, 17/2020 dated April 13, 2020, and subsequent circulars issued in this regard, the latest being 03/2025 dated September 22, 2025 issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA") (hereinafter collectively referred to as "MCA Circulars") and pursuant to Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as amended ("SEBI Listing Regulations") and other applicable Rules made thereunder (Including any statutory modification or re- enactment thereof for the time being in force), Secretarial Standard on General Meeting ("SS -2"), the Company has on November 18, 2026 completed the dispatch of postal ballot notice to all the members whose name appear in the register of members as on November 13, 2026 through Email to the members whose Email IDs are registered in the records of Depository Participant (DP) for seeking approval of the members of the company by postal Ballot for the following ordinary/special resolution by way of remote e-voting ("e-voting") process.

Sr. No.	Particular
1	Material Modification of earlier approved Material Related Party Transactions between the Company and Virtuoso Compressors Private Limited
2	Appointment of Mr. J Vishnuvardhan (DIN: 10983248) as an Independent Director of the Company.

The communication of the assent or dissent of the members would take place only through the remote e-voting system for that the Company has engaged the service of Central Depository Services (India) Limited (CDSL) for providing E- Voting facility to the Members, Members are requested to note that voting though electronic mode shall commence on November 19, 2026 at 09.00 am and shall remain open till December 18, 2026 till 05.00 pm. The vote received after 05.00 pm shall not be considered for the purpose of Postal Ballot voting.

The Board of Directors of the Company has appointed CS Vishal Thawani, Designated Partner of M/s. VTSN and Associates LLP, Company Secretaries, having Membership No. 43938, to act as Scrutinizer for conducting the Postal Ballot (Including e-voting) process in a fair and transparent manner.

The result of Postal Ballot will be announced by the Chairman or any other person authorized by him after completion of the scrutiny of Postal Ballots and E-voting at 05.00 PM on December 20, 2026 and the same shall be communicated to the stock exchange, Registrar and Transfer Agent (RTA), depository of the Company and the same shall also be displayed on the website of the company i.e. www.voepl.com.

In case of any queries / grievances connected with voting by electronics means, you may contact Mr. Rakesh Dalvi, AVP, (CDSL), or send an email to helpdesk.evoting@cdslindia.com or call at toll free no. 1800 21 09911.

A copy of this notice is also available on the website of the Company www.voepl.com and also on the website of the Central Depository Services (India) Limited (CDSL) i.e. www.evotingindia.com.

All the documents referred to in this notice and in the explanatory statement shall be available for inspection at the registered office of the Company during working hours on working days from the date of dispatch of notice till 05.00 pm, November 18, 2026.

For Virtuoso Optoelectronics Limited
Sd/-
Prasad Zinjurde
Company Secretary & Compliance Officer

Place: Nashik
Date: 18-11-2026

गौळाणे, आंबेबहुलाचे शेतकरी संतप्त

योग्य मोबदला द्या, अन्यथा सामूहिक आत्महत्या करण्याचा इशारा

रिंग रोड संपादनाला शेतकऱ्यांचा पवित्रा

◆ सिडको (प्रतिनिधी) :

मुंबई महामार्गालगत असलेल्या गौळाणे व अंबेबहुला या गावांमध्ये रिंग रोडच्या संपादनासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना संतप्त शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करत परत पाठवले. आमचा रिंग रोडच्या कामास विरोध नाही, मात्र योग्य मोबदला द्या, मगच आमच्या शेतात पाय ठेवा; तसेच पोलिस बळाचा वापर केल्यास दोन्ही गावांतील शेतकरी सामूहिक आत्महत्या करतील, असा गंभीर इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून रिंग रोड संपादनासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. आज तहसीलदार व महसूल विभागाचे अधिकारी पोलीस



> महसूल विभागाचे अधिकारी आज अंबेबहुला येथे रिंग रोडच्या कामासाठी आले होते. मात्र, त्यांनी शेतकऱ्यांचा उद्रेक पाहिला आणि काढता पाय घेतला. योग्य मोबदला मिळाल्याशिवाय आम्ही जागा देणारच नाही आणि वेळ आली तर सामूहिक आत्महत्या करू.
>
> **-संजय चुंभळे**, शेतकरी

प्रशासनासह अंबेबहुला येथे गेले होते. मात्र, गौळाणे व अंबेबहुला येथील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करत जोपर्यंत योग्य दर व मोबदला मिळत नाही, तोपर्यंत जागा देणार नाही, अशी ठाम भूमिका घेतली. या दोन्ही गावांसंदर्भातील बैठकीत मुख्यमंत्र्यांनी, या भागातील ९० टक्के शेती आधीच संरक्षण विभागाला देण्यात आल्याने आणि आता केवळ १० टक्के शेती शिल्लक असल्याने या दोन्ही गावांना विशेष पॅकेज देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, प्रशासन वारंवार वेळकाढूपणा करत असून सातत्याने संपर्क साधूनही सहकार्य करत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

शासनाने इतर गावांमध्ये दिलेला दर आणि आमच्या दोन्ही गावांच्या दरात मोठी तफावत आहे. ती तफावत दूर करावी, निवाडा झाला असला तरी पुर्ननिवाडा करून योग्य मोबदला द्यावा आणि मगच संपादनाचे काम हाती घ्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. यावेळी पोलीस उपअधीक्षक योगेश म्हस्के, तहसीलदार पंकज पवार, पोलीस निरीक्षक धीरज महाजन, सर्कल सत्यजित गोसावी, तलाठी अरुण मोरे यांना शेतकऱ्यांनी निवेदन दिले. शेतकऱ्यांचा वाढता रोष पाहून अधिकाऱ्यांनी तिथून काढता पाय घेतला. याप्रसंगी दोन्ही गावांतील संजय चुंभळे, संतोष सहाणे, सुरेश देशमुख, शंकर गडकरी, दत्तू थापेकर, किशोर केदार, केशव देशमुख, किरण लांडे, रामदास लांडे, सहादू गवारी, मोहन भांडे, पुंडलिक देशमुख, दीपक देशमुख, योगेश गडकरी, उल्हास देशमुख, विशाल सहाणे, बाळासाहेब चुंभळे, प्रभाकर चुंभळे, खंडेराव सहाणे, संजय चव्हाण आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

उदाजी संग्रहालयात 'चित्रकथी रामायण' प्रदर्शन

जागतिक वारसा सप्ताहानिमित्त आयोजन

◆ नाशिक (प्रतिनिधी) :



जागतिक वारसा सप्ताहानिमित्त मविप्र उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय आणि इंटॅक नाशिक चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने उदाजी संग्रहालयात १९ ते २५ नोव्हेंबरदरम्यान 'चित्रकथी रामायण' या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला परंपरेतील चित्रकथी ही चित्रांच्या माध्यमातून पौराणिक कथा व प्रसंग सादर करणारी एक वैशिष्ट्यपूर्ण पारंपरिक कला आहे. रामायणातील विविध प्रसंग चित्रांच्या माध्यमातून उलगडणाऱ्या या प्रदर्शनातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोककलेचा वारसा अनुभवण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. आधुनिक डिजिटल युगात पारंपरिक लोककला नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार असून विद्यार्थी, कलाप्रेमी, इतिहास अभ्यासक आणि नागरिकांसाठी ते ज्ञानवर्धक ठरणार आहे. ऐतिहासिक वास्तू आणि संस्कृतीच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली के. के. वाघ फाईन आर्ट कॉलेजचे प्राचार्य बाळ नगरकर यांच्या हस्ते होणार आहे. मविप्र उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय, नाशिक येथे १९ ते २५ नोव्हेंबर २०२६ दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार असून नाशिककरांनी कुटुंबीय, मित्रपरिवार व विद्यार्थ्यांसह आवर्जून भेट देऊन या लोककलेचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पांडे यांच्या तक्रारीची बडोदा बँकेकडून १०० तासांत दखल

विभागीय व्यवस्थापक प्रवीण तळणीकर यांच्याकडून कर्मचाऱ्यांची कानउघाडणी

◆ मनमाड (प्रतिनिधी) :



भाजपचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष नितीन पांडे यांनी बँक ऑफ बडोदाच्या मनमाड शाखेतील गैरकारभाराबद्दल केलेल्या तक्रारीची वरिष्ठ प्रशासनाने अवघ्या १०० तासांत दखल घेतली. या संदर्भात नाशिकचे रिजनल मॅनेजर प्रवीण तळणीकर आणि फिल्ड अधिकारी दत्तात्रय कोळी यांनी मनमाड शाखेला प्रत्यक्ष भेट देऊन नितीन पांडे यांच्याशी तब्बल दीड तास सविस्तर चर्चा केली व सर्व पुराव्यांची नोंद घेतली.

मनमाड शाखेत गेल्या साडेचार महिन्यांपासून मुख्य व्यवस्थापक नसल्याने कामकाज विस्कळीत झाले आहे. याबाबत बोलताना पुढील महिन्याभरात मुख्य व्यवस्थापकाची नेमणूक केली जाईल आणि प्रलंबित असलेली ६० ते ७० कर्ज प्रकरणे तातडीने निकाली काढली जातील, असे आदेश तळणीकर यांनी दिले. तसेच, केवायसीच्या नावाखाली ज्येष्ठ नागरिक, महिला व व्यापाऱ्यांना वारंवार बोलावून त्रास देणे, खात्यातून परस्पर शुल्क व दंड कापणे, एसएमएस न येताही शुल्क आकारणे, एक हप्ता थकल्यास ऑनलाइन बँकिंग बंद करणे, ग्राहकांशी उद्धट वागणूक आणि तक्रार पुस्तक उपलब्ध न करून देणे यांसह ११ गंभीर मुद्द्यांवर त्यांनी शाखा अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली. या वेळी मनमाडमधील ग्राहक, व्यापारी, शेतकरी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिजनल मॅनेजर तळणीकर यांनी या सर्व तक्रारींवर लवकरच योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष सुधारणा व्हावी, अन्यथा पुन्हा वरिष्ठ पातळीवर दाद मागू, असा इशारा नितीन पांडे यांनी यावेळी दिला.

नाशिकमध्ये 'किसना'चे १५ वे विशेष दालन सुरू

घनश्याम ढोलकिया, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत उद्घाटन

◆ नाशिक (प्रतिनिधी) :



नैसर्गिक हिरे आणि सोन्याच्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या 'किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी'ने नाशिकमध्ये महाराष्ट्रातील १५ व्या विशेष ब्रँड दालनाचे उद्घाटन केले. हरि कृष्णा ग्रुपचे संस्थापक घनश्याम ढोलकिया आणि नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद (आयएएस) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला. यावेळी व्यावसायिक भागीदार कुणाल संभाजी गवळी, रोहित प्रकाश विभंडिक आणि वास्तुविशारद रश्मी आनंद जोशी उपस्थित होते.

शरणपूर येथील जेजुरकर वाडी, रक्का कॉलनी, पतंग हॉटेलजवळ, प्लॉट क्रमांक ३१७, दुकान क्रमांक ७ येथे हे दालन सुरू करण्यात आले आहे. येथे ग्राहकांना हिऱ्यांच्या आणि सोन्याच्या दागिन्यांचे विविध प्रकार उपलब्ध होणार आहेत.

घनश्याम ढोलकिया म्हणाले, की देशातील प्रत्येक घरापर्यंत दर्जेदार हिऱ्यांचे व सोन्याचे दागिने पोहोचवणे हे किसनाचे ध्येय आहे. नाशिकमधील नवीन दालन हा महाराष्ट्रातील विस्ताराचा महत्त्वाचा टप्पा आहे.

पराग शाह यांनी ग्राहकांना अत्याधुनिक डिझाइन्स, उत्कृष्ट गुणवत्ता, पारदर्शक खरेदी आणि उत्तम सेवा देण्याची ब्रँडची बांधिलकी व्यक्त केली. कुणाल संभाजी गवळी, रोहित प्रकाश विभंडिक आणि वास्तुविशारद रश्मी आनंद जोशी यांनीही ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासोबतच सामाजिक कार्यात योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.उद्घाटनानिमित्त स्वच्छ भारत अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर आणि गरजूंना अन्नवाटप असे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. हरि कृष्णा ग्रुपचा भाग असलेला किसना ब्रँड नैसर्गिक हिऱ्यांचे आणि सोन्याचे आकर्षक दागिने व नाविन्यपूर्ण डिझाइन्ससाठी ओळखला जातो.

शहर, तालुक्यात मारहाणीचे दोन प्रकार उघडकीस

◆ मालेगाव (प्रतिनिधी) :

शहरातील दरेगाव शिवारात तरुणाला तर चिंचावड येथे दाम्पत्याला किरकोळ वादातून मारहाण करण्याचा प्रकार घडला. येथील दरेगाव शिवारातील जलाल अहमद मोहम्मद हनीफ (वय २९, रा. देवीचा मळा) हा ६० फुटी रस्त्यावरील अली हॉटेल येथे पाणी पिण्यासाठी थांबला होता. त्यावेळी साऱ्या डॉन (रा. अख्तराबाद) व कल्लुया (रा. जाफरनगर, दोघांची पुर्ण नाव माहित नाही) यांनी मागील भांडणाची कुरापत काढून मारहाण केली.

साऱ्या डॉनने काहीतरी धारदार हत्याराने मारुन दुखापत केली. कल्लुया याने लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. १६ नोव्हेंबरला सायंकाळी साडेसातला हा प्रकार घडला. पवारवाडी पोलिस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

चिंचावड (ता. मालेगाव) येथे बुधाजी बाळा पवार (वय ६०, रा. रोहीदास वस्ती) यांनी दादाजी केदा पवार यांना शेतात बांधाजवळ बांधलेला बैल तू का सोडून दिला अशी विचारणा केल्याचा राग आल्याने दादाजीने शिवीगाळ केली. औत हाकणाऱ्या बैलांच्या काठीने उजव्या हाताच्या मनगटाजवळ, पाठीवर, कमरेवर मारुन दुखापत केली.

बुधाजी यांची पत्नी जन्याबाई भांडण सोडविण्यासाठी आल्या असता त्यांनाही शिवीगाळ करुन हाताचापटीने मारहाण करुन जमीनीवर ढकलून दिले. किशोरने बुधाजी यांना शिवीगाळ करुन तुमच्याने जे होईल ते करुन घ्या असा दम दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तालुका पोलिस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

लाटीपाड्याच्या पाण्यासाठी शेतकरी एकवटणार

तीन ते चार आवर्तनांसाठी आ. मंजुळा गावित, पालकमंत्र्यांना साकडे





◆ पिंपळनेर (प्रतिनिधी) :

येथील पांझरा मध्यम प्रकल्प अर्थात लाटीपाडा धरणातून शेतीसाठी पाण्याची तीन ते चार आवर्तने सोडण्यात यावीत, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी आता आमदार मंजुळा गावित यांनाही साकडे घातले आहे. यापूर्वी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडेही पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली होती. दरम्यान, येत्या शुक्रवारी (दि. २०) पाटबंधारे विभागाच्या पिंपळनेर कार्यालयाजवळ हजारो शेतकरी एकत्र येऊन आपल्या मागण्यांसाठी एकजूट दाखविणार असून यासंदर्भात तहसीलदार व पिंपळनेर पोलीस ठाण्याला निवेदन देण्यात आले आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे.

स्थानिक रोजगाराचीही साखळी

साक्री तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील आदिवासी बांधवांना स्वतःच्या परिसरात रोजगार नसल्याने रब्बी हंगामापासून उन्हाळ्यापर्यंत पिंपळनेर, चिकसे, देशशिरवाडे, देगाव, गव्हाणीपाडा, उंभरे, सामोडे, शेणपूर व मलांजन आदी गावांमध्ये मोलमजुरीसाठी जावे लागते. या गावांमधील शेतीकामांवरच अनेक आदिवासी कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने धरणातून शेतीला पाणी मिळाल्यास स्थानिक पातळीवरील रोजगाराच्या संधीही टिकून राहणार आहेत.

परिणामी नदी, नाले व विहिरींमधील पाणीसाठा घटल्याने अनेक ठिकाणी टंचाई निर्माण झाली असून शेतीसोबतच पशुधन जगवण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे. संबंधित गावांमध्ये पाळीव जनावरांची संख्या मोठी असल्याने चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. त्यासाठी लाटीपाडा धरणाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या एक ते आठ पाटचारी क्षेत्रातील गावांमधील शेतकऱ्यांनी एकत्रित प्रयत्न सुरू केले आहेत. पाणी उपलब्ध झाल्यास रब्बी पिकांना आधार मिळण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर सहा ते सात गावांतील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ मंत्री, आमदार व अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन आपली कैफियत मांडत आहे. शुक्रवारी पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाणी सोडण्याची मागणी केली जाणार आहे.

अवैध दारूसाठा जप्त; एकावर गुन्हा

सिडको : पंडितनगर परिसरात विनापरवाना देशी दारू विक्रीसाठी साठा करून ठेवणाऱ्या अमोल अशोक पारधी (२८, रा. वेलनायक कॉलनी, पंडितनगर) याच्याविरुद्ध अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी मच्छी मार्केट परिसरातील बंद पडलेल्या गाळ्याच्या आडोशाला कारवाई केली. घटनास्थळी ७६० रुपये किमतीच्या देशी दारूच्या १९ सीलबंद बाटल्या होत्या.

व्हर्चुओसो ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड
CIN No. L74999MH2015PLC268355
नोंदणीकृत कार्यालय: पी. क्रमांक ७, एमआयडीसी, सातपूर, नाशिक महाराष्ट्र - ४२२००७.
दूरध्वनी : +९१-०२५३-२३०९०१६
ईमेल : info@voepl.com वेबसाईट : www.voepl.com

पोस्टल मतपत्रिकेची सूचना

सर्व सदस्यांना,

सूचना कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") च्या कलम १०८, ११० आणि इतर लागू तरतुदी, असल्यास, तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ("नियम") मधील नियम २० आणि नियम २२ यांसह, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेली सर्वसाधारण परिपत्रके क्र. १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, क्र. १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० आणि यासंदर्भात वेळोवेळी जारी केलेली त्यानंतरची परिपत्रके, ज्यामध्ये नवीनतम परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ यांचा समावेश आहे (यापुढे एकत्रितपणे "एमसीए परिपत्रके" असे संबोधण्यात येईल), तसेच भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ मधील विनियम ४४, त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह ("सेबी सूचीबद्धता विनियम"), त्याअंतर्गत लागू असलेले इतर नियम (सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुनरधिनियमनासह) आणि सर्वसाधारण सभांबाबतचे सचिवीय मानक ("एसएस-२") यांच्या तरतुदींनुसार, याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीने दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पोस्टल बॅलेटची सूचना अशा सर्व सभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे, ज्यांची नावे दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सभासदांच्या नोंदवहीमध्ये समाविष्ट आहेत आणि ज्यांचे ई-मेल आयडी डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) यांच्या अभिलेखांमध्ये नोंदणीकृत आहेत. सदर पोस्टल बॅलेटद्वारे कंपनीच्या सभासदांची खालील सामान्य/विशेष ठरावांना मंजुरी मिळविण्यासाठी दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे ("ई-मतदान") मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अनुक्रमांक	विशेष
१	कंपनी आणि व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामधील यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहारांमध्ये महत्त्वपूर्ण बदल.
२	श्री. जे. विष्णुवर्धन (डीआयएन: १०९८३२४८) यांची कंपनीच्या स्वतंत्र संचालकपदी नियुक्ती.

सभासदांची संमती किंवा असहमती केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारेच नोंदविण्यात येईल. त्यासाठी कंपनीने सभासदांना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीसीएल) यांची सेवा घेतली आहे. सभासदांनी याची नोंद घ्यावी की, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाची प्रक्रिया दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता सुरू होईल आणि दिनांक १८ डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत खुली राहील. सायंकाळी ०५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या मतांचा पोस्टल बॅलेट मतदानासाठी विचार केला जाणार नाही.

पोस्टल बॅलेट (ई-मतदानासह) प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनी सेक्रेटरीज असलेल्या मे. व्हीटीएसएन अँड असोसिएट्स एलएलपी चे नामनिर्देशित भागीदार सीएस विशाल थवानी, सभासदत्व क्रमांक ४३९३८ यांची छाननी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

पोस्टल बॅलेट आणि ई-मतदान प्रक्रियेची छाननी पूर्ण झाल्यानंतर, दिनांक २० डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता अध्यक्ष किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या अन्य व्यक्तीद्वारे पोस्टल बॅलेटचा निकाल जाहीर करण्यात येईल. सदर निकालाची माहिती स्टॉक एक्स्चेंज, कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण प्रतिनिधी (आरटीए) तसेच कंपनीच्या डिपॉझिटरी यांना कळविण्यात येईल. तसेच सदर निकाल कंपनीच्या www.voepl.com या संकेतस्थळावरही प्रदर्शित करण्यात येईल.

इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानासंदर्भात काही शंका किंवा तक्रारी असल्यास, सभासद श्री. राकेश दळवी, एव्हीपी, (सीडीसीएल) यांच्याशी संपर्क साधू शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com या ई-मेल पत्त्यावर ई-मेल पाठवू शकतात अथवा टोल फ्री क्रमांक १८०० २१ ०९९११ वर संपर्क साधू शकतात.

या सूचनेची प्रत कंपनीच्या www.voepl.com या संकेतस्थळावर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीसीएल) यांच्या www.evotingindia.com या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

या सूचनेमध्ये आणि स्पष्टीकरणात्मक निवेदनामध्ये संदर्भित केलेली सर्व कागदपत्रे, सूचना पाठविण्याच्या दिनांकापासून ते दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कामकाजाच्या वेळेत पाहणीसाठी उपलब्ध असतील.

व्हर्चुओसो ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडकरिता
सही/-
प्रसाद झिंजुर्डे
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाण: नाशिक
दिनांक: १८.११.२०२६

वाचनाच्या वाटेवरून विचारांच्या अवकाशाकडे...

तरुणाईच्या लेखणीतून उमलणार उद्याचे आश्वासक चित्र!

मनोरंजन

राजू देसले

एखाद्या महाविद्यालयीन अंकाची अनुक्रमणिका पाहणे हादेखील एक वेगळा साहित्यिक अनुभव असतो; कारण अनुक्रमणिकेतील विषय केवळ लेखांची शीर्षके सांगत नाहीत, तर त्या पिढीची विचारदिशा, जिज्ञासा, सामाजिक भान आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही उलगडून दाखवतात.



विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ देण्यासाठी, प्रयोगशील जाणिवेतून देवळा येथील कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने गेली अठ्ठेचाळीस वर्षे अव्याहतपणे नियतकालिकांची अनोखी परंपरा जपली आहे. या अंकांतील विषयांचे वेगळेपण आणि लेखन साहित्यविश्वात एक दस्तावेज ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाट करून देणारे आणि त्यांना आत्मविश्वास देणारे प्राचार्य हितेंद्र आहेर, लिहित्या हातांना बळ देणारे मार्गदर्शक-गुरू, कवी व समीक्षक डॉ. एकनाथ पगार, तसेच संपादक प्रा. रवींद्र पगार व संपादक मंडळाची मेहनत या अंकामागे स्पष्टपणे जाणवते. देवळा महाविद्यालयाच्या 'बांधिलकी' २०२५-२६ या अंकातील पुस्तक विशेषांक पाहताना हे प्रकर्षाने जाणवते. विद्यार्थ्यांनी निवडलेले विषय आणि त्यांची शीर्षके पाहिली की, तरुणाई केवळ आजच्या आभासी जगात रमलेली नाही, तर ती पुस्तकांच्या सहवासात स्वतःचा स्वतंत्र विचारविश्वाचा शोधही घेत आहे, याची खात्री पटते.

'मी विजेता होणारच', 'अंतः अस्ति प्रारंभ', 'स्वप्नाकडून सत्याकडे', 'कर्माचा सिद्धांत', 'द आर्ट ऑफ बिइंग अलोन' (The Art of Being Alone) यांसारखी शीर्षके तरुण मनातील आत्मशोध, आत्मविश्वास आणि जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी अधोरेखित करतात. तर 'गरुडझेप', 'कफन', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'स्त्री-पुरुष तुलना', 'शेतकऱ्याचा असूड', 'गुलामगिरी', 'पवित्र बायबल', 'देश-परदेश' अशा विषयांतून इतिहास, समाजव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक जाणीव यांचे विविध पदर समोर येतात.

विशेष म्हणजे, हा आवाका केवळ साहित्य आणि विचारांपुरता मर्यादित नाही. शेती, विज्ञान, संशोधन, अध्यात्म, व्यक्तिमत्त्व विकास, प्रवास, चरित्र, नाट्य, क्रीडा आणि मानवी नातेसंबंध अशा अनेक विषयांना विद्यार्थ्यांनी स्पर्श केला आहे. स्वामी विवेकानंद, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अशा व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा परिचय करून घेण्याची त्यांची उत्सुकताही लक्षणीय आहे. पुस्तक संग्राहक व वाचक रवींद्र देवरे (चांदवड) यांची पुस्तक मित्र म्हणून घेण्यात आलेली प्रेरणादायी मुलाखत या अंकाचे वैशिष्ट्य ठरली आहे.

या अंकातील दुसऱ्या भागात पुस्तकप्रेम, वाचनसंस्कृती, वाचनाचे अनुभव, प्रभाव टाकणारी पुस्तके, ग्रंथालय आणि बदलत्या जगात पुस्तकांचे महत्त्व अशा विषयांचा समावेश आहे. विशेषतः पुस्तकप्रेमींच्या मुलाखती आणि वाचनानुभवांमधून वाचनसंस्कृतीची नवी रुजवात करण्याचा प्रयत्न दिसून येतो. या अंकातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ परिचित आणि लोकप्रिय विषयांची निवड केलेली नाही, तर काहीशी आव्हानात्मक, वैचारिक आणि सामाजिक आशय असलेल्या विषयांनाही सामोरे जाण्याचे धाडस दाखवले आहे. हीच त्यांच्या वैचारिक वाढीची खरी खूण आहे.

आजच्या काळात तरुण पिढी वाचत नाही आणि तिची पुस्तकांशी नाळ तुटत चालली आहे, अशी चिंता वारंवार व्यक्त केली जाती. मात्र, 'बांधिलकी'चा हा पुस्तक विशेषांक त्या चिन्तेला अत्यंत आश्वासक उत्तर देतो. पुस्तकांच्या पानांमधून नवे जग शोधणारी, प्रश्न विचारणारी, स्वतःची मते घडवणारी आणि समाजाशी नाते जोडू पाहणारी एक जिज्ञासू तरुणाई येथे भेटते. महाविद्यालयीन नियतकालिकाचे खरे यश केवळ त्याच्या निर्मितीत नसते, तर विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची आवड, चिंतनाची सवय आणि अभिव्यक्तीचे धाडस निर्माण करण्यात असते. या दृष्टीने देवळा महाविद्यालयाच्या 'बांधिलकी'चा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

कारण, पुस्तक वाचणारी पिढी केवळ माहिती मिळवत नाही, तर ती स्वतःला घडवत असते आणि स्वतःला घडवणारी पिढीच उद्याचा समाज अधिक संवेदनशील, विवेकी व समृद्ध करू शकते. चित्रकार व कवी दिनकर मनवर यांचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठावरील कविता अंकाचे आशयगर्भपण चोखपणे अधोरेखित करते. 'बांधिलकी'च्या या पुस्तक विशेषांकातून उमटणारी हीच तरुणाईची आश्वासक चाहूल आहे!

देवळा महाविद्यालयातील संपादक मंडळ, प्राध्यापक आणि या अंकात लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

सार्वजनिक वाचनालयात २१ला मैफल

नाशिक : सार्वजनिक वाचनालय, नाशिकच्या कार्यकारी मंडळातर्फे 'स्वर सावाना' या मासिक सांस्कृतिक उपक्रमांतर्गत शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजता ग्रंथभूषण मु.शं. औरंगाबादकर सभागृहात 'सफर राग से गीतों तक' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मैफलीत सुप्रसिद्ध गायिका आरती दीक्षित (पुणे) शास्त्रीय रागांवर आधारित हिंदी चित्रपट गीतांची प्रस्तुती करणार आहेत. त्यांना सहगायिका नमिता राजहंस, अनन्या निमगावकर (गायन व निवेदन) आणि शाल्मली गायधनी साथ देणार आहेत. तबला साथ अमोल पाळेकर यांची, तर ध्वनियोजना सचिन तिडके यांची आहे. कार्यक्रमास सिग्मा सायन्स अकॅडमीचे अतुल पुराणिक व सौ. दुहिता अतुल पुराणिक यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्याध्यक्ष संजय करंजकर, गिरीश नातू, जयेश बर्वे, प्रशांत जुन्नरे तसेच कार्यकारी मंडळा ने केले आहे.